**लातूर वृक्ष लागवड उपक्रमाचे आयोजन : (दि.०१  ते १५ जुलै २०१७)**

दि.०१ ते १५ जुलै २०१७ रोजी लातूर वृक्ष समिती व राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या रासेयो विभागातर्फे संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वृक्ष लागवडीची मोहीम सदर वर्षात सुरू करण्यात आली. या मोहिमेचा भाग म्हणून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाविद्यालयातील रासेयो समन्वय समितीने १००१ वृक्ष लागवडीचा संकल्प केला व लातूर मधील विविध परिसरात २५० ते ३०० वृक्षांची लागवड केली.  या प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लातूर वृक्ष तर्फे लागवडीसाठी वृक्षांचे वाटप देखिल करण्यात आले.




या प्रसंगी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या २२८ स्वंयसेवकांनी सहभाग नोंदवलेला होता. या प्रसंगी लातूर वृक्ष समितीचे दक्ष नागरिक समन्वय श्री. सुपर्ण जगताप, नगरसेवक श्री. इमराण सय्यद, श्री. महेश बिडवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. साळुंके, उपप्राचार्य डॉ. एम.एच. गव्हाणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी. सावंत, प्रा. श्रीहरी तलवारे, प्रा. विजय गवळी इतर प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. श्रीनिवास मोरे, प्रा. सुदर्शन पाटील व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे, मलवाडे प्रिती इत्यादींनी परिश्रम घेतले.

**ग्रीन आर्मीत रजीस्ट्रेशन संबंधीत बैठक : (दि.१५ डिसेंबर, २०१७)**

दि.१५ डिसेंबर २०१७ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागात महाराष्ट्र ग्रीन आर्मी रजीस्ट्रेशन करण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत रासयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के.डी.सावंत, डॉ.पी.जी.कावळे, प्रा.विजय गवळी, व विद्यार्थी प्रतिनिधी अजय कांबळे, कल्पना फरकांडे व इतर विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

